दैनिक अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक १३२ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.५ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पनवेलमध्ये रिव्हॉल्व्हरचा दस्ता डोक्यात मारुन ७५ लाखाचे सोने लुटले

## पनवेलमधील बाजारपेठेतील घटना ; व्यापारी वर्गात घबराट


**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल शहरातील जोशी आळी येथील गोकुळ गोल्ड सोसायटीमध्ये पहिल्या मजल्यावर असलेल्या सोन्याचे रिफाईन सेंटर मधील एका इसमाला त्याच्या ताब्यातील सोने खाली घेवून येत असताना दोन अज्ञात इसमांनी त्याच्या डोक्यात रिव्हॉल्व्हरचा दस्ता मारुन त्याच्याकडील सोन्याची बॅग काढून घेवून ते मोटार सायकलवरुन पसार झाल्याची घटना घडली आहे. सदर बॅगेमध्ये साधारणत : दिड किलो सोने ज्याची अंदाजे किंमत ७५ लाख एवढी असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.**

शहरातील जोशी आळी येथील गोकुळ गोल्ड सोसायटीमधील पहिल्या मजल्यावर धीरज जैन व रावसाहेब कोळेकर यांचे सोन्याचे रिफाईन सेन्टर आहे. दिपेश जैन मुंबई व्यापारी आहेत ते सदर दुकानातुन खाली येत असता भर बाजारात २ मजबुत शरीरयष्टीचे इसम त्यांची वाट पहात टेहळणीवर होते. दिपेश जैन हे खाली येताच एक इसमाने त्यांना रिव्हॉल्व्हरचा धाक दाखविला व त्यांच्या जवळील सुमारे दिड कीलो सोन्याची असलेली बॅग हिसकाविण्याचा प्रयत्न करू लागला. आपल्या हातात बॅग येत नसल्याची पाहुन सदर इसमाने व्यापारी दिपेश जैन यांच्या डोक्यात रिव्हॉल्व्हरचा दस्ताच डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी करून दोन्ही अनोळखी इसम मोटारसायकल घेऊन फरार झाले. सदर सोन्याची अंदाजे किंमत ७५ लाख इतकी आहे. यावेळी दिपेश जैन याने तो रक्ताच्या थारोळ्यात असतानाही पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. परंतु ते गल्लीतून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त विनोद चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त



भागवत सोनावणे, वपोनि अजयकुमार लांडगे, वपोनि बी.एन.कोल्हटकर, वपोनि गिरीधर गोरे, वपोनि रवींद्र दौंडकर यांच्यासह विविध पथके घटनास्थळी पोहोचली आहेत. त्या भागातील विविध दुकानात असलेल्या सिसिटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात असून जखमी दिपेश जैन याला शहरातील पटेल रुग्णालय येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले




आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गात भितीयुक्त वातावरण आहे.

# खारघरमधील कोपरा खाडीत अवैधरित्या वाळू उपसा ; पनवेल तहसीलची कारवाई

## कारवाईने वाळू माफियांचे धाबे दणाणले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघरमधील कोपरा खाडीत रेल्वे पुलाजवळ अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर पनवेल महसूल विभागाने कारवाई केली आहे. खारघरमधील कोपरा खाडीत अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबतच्या तक्रारीनुसार पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पनवेल महसूल विभागाने अवैध वाळू उत्खनन करणाऱ्यांवर धडक कारवाईचे सत्र सुरूच ठेवले आहे. मागील महिन्यात देखील पनवेलमधील रोडपाली व वाघिवली येथे अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर तहसीलदार विजय तळेकर



यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे बेकायदेशीर वाळू उत्खनन करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दण–णले आहेत.

अनधिकृत रेती उत्खनन होत असून त्यामुळे रेल्वे पुलाला धोका निर्माण होत असल्याची माहिती तहसीलदार विजय तळेकर यांना मिळाली.

.../२

# पेणमध्ये भाजपला खिंडार ; विष्णूभाई पाटील यांचा पुन्हा शिवसेनेत प्रवेश

## मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या उपस्थित प्रवेश

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यात भाजपला अनेक धक्के बसत असून भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष तथा जिल्ह्यातील आंदोलन सम्राट म्हणून प्रसिद्ध असलेले रायगड जिल्हा शिवसे–नेचे माजी जिल्हाप्रमुख विष्णूभाई पाटील यांनी पुन्हा एकदा शिवसेनेत प्रवेश केला आहे. मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्या हस्ते मातोश्री येथे प्रवेश झाला आहे. काही दिवसांपूर्वी भाजप उपाध्यक्ष संजय जांभळे यांनी शिवसेनेत तर सर्वात श्रीमंत असणारे भाजपचे वडखळ सरपंच राजेश मोकल यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. त्यामुळे सध्या पेण तालुक्यात भाजपला खिंडार पडत आहे.



शिवसेनेचे रायगड जिल्ह्यातील उत्तम संघटक म्हणून ओळख असलेले विष्णूभाई पाटील यांनी पक्षातील अंतर्गत कलहातून काही वर्षांपूर्वी शिवसेनेला जय महाराष्ट्र करून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. त्यांना भाजपचे दक्षिण रायगडचे उपाध्यक्ष पद दिले गेले होते. मात्र शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे कट्टर समर्थक असलेले विष्णूभाई पाटील हे गटतट असलेल्या भाजप मध्ये फारसे रमले नाहीत. शिवसेनेत नसताना देखील त्यांनी मागील लोकसभा निवडणुकीत देखील शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते यांचा प्रचार केला होता. मंगळवारी त्यांनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची मातोश्री निवासस्थानी भेट घेऊन पुन्हा एकदा शिवसेनेचा भगवा

.../२



# न्याहरी, सायकल आणि संसद

काँग्रेसचे माजी अध्यक्ष खासदार राहुल गांधी यांनी विरोधकांना लागोपाठ दोनदा एकत्र आणले आहे. मंगळवारी त्यांनी बोलाविलेल्या न्याहरी बैठकीला १७ विरोधी पक्षांचे नेते हजर होते. लोकसभेच्या निवडणुका अजून दूर असल्या तरी देशाच्या राजकारणाची दिशा ठरविणाऱ्या उत्तर प्रदेश विधानसभेची निवडणूक फार दूर नाही. खरेतर, संसदेचे पावसाळी अधिवेशन चालू आहे. तेथे सगळ्या प्रश्नांची सविस्तर चर्चा व्हायला हवी. मात्र, संसदेचे हे अधिवेशन सुरू होण्याच्या मुहूर्तावरच 'पेगासस' या फोनपाळत प्रकरणाचा अचानक स्फोट झाला आणि त्यातच संसदेचे महत्त्वपूर्ण पावसाळी अधिवेशन आता वाहून चालले आहे. 'पेगासस' प्रकरणी चर्चा करण्याची विरोधकांची मागणी केंद्र सरकारने मान्य करायला हवी होती. जर या पाळत प्रकरणात सरकारकडे लपविण्यासारखे काही नसेल तर ते संसदेच्या पटलावर ठेवण्यात किंवा त्यावर चर्चा होण्यात काय गैर आहे? राहुल गांधी हे विरोधी नेत्यांशी चर्चा करीत असताना आणि त्यानंतर विरोधी खासदारांसमेवत संसदेवर सायकल मोर्चा नेत असताना भारतीय जनता पक्षाच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विरोधकांना संसदेचे कामकाज चालू न दिल्याबद्दल दोषी ठरवत होते. कामकाज होऊ न देणे हा आजच्या विरोधकांचा दोष असेल तर भाजपने डॉ. मनमोहन सिंग यांच्या दोन्ही कार्यकाळात हेच अनेकवार केले आहे. तेव्हा अनेक अधिवेशने अशीच विरोधकांच्या बहिष्कारात, सभात्यागात आणि कामकाज बंद पाडण्यात वाहून गेली आहेत. दुसरे असे की, संसदेचे कामकाज सुरळीत व्हावे, अशी सरकार पक्षाची इच्छा असेल तर विरोधकांची एखाद्या विषयावर चर्चा करण्याची इच्छा मान्य करायला हवी. केवळ बहुमताच्या जोरावर संसदेत चर्चाच होऊ द्यायची नाही, ही सरकारची दृष्टी योग्य नाही. विरोधकांनी कामकाजावर बहिष्कार टाकू नये, यासाठी संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी ज्येष्ठ काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खरगे यांची भेट घेतली. पण या भेटीतूनही काही निघालेले दिसत नाही. पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या विजयानंतर विरोधकांच्या ऐक्याच्या प्रयत्नांना नवा वेग आला आहे. या ऐक्याचे नेतृत्व ममता बॅनर्जी करणार की, सगळ्यांत मोठा पक्ष या नात्याने काँग्रेसकडे विरोधकांचे नेतेपद जाणार, या अजून दूरच्या बाबी असल्या तरी ममतांची दिल्ली भेट, विरोधी नेत्यांशी चर्चा आणि आक्रमक टीका यामुळे हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी या आधी न दाखविलेली सक्रियता उठून दिसणारी आहे. त्यांच्या निमंत्रणाचा मान केवळ आम आदमी पक्ष आणि मायावती यांचा बहुजन समाज पक्ष या दोनच महत्त्वाच्या पक्षांनी ठेवलेला दिसत नाही. यातील, आम आदमी पक्षाला पंजाबमध्ये विधानसभेची निवडणूक ताकदीने लढवायची आहे आणि तेथे काँग्रेस हाच प्रमुख प्रतिस्पर्धी आहे. मायावती अजूनतरी भाजपच्या विरोधात मैदानात उतरण्यास फारशा उत्सुक दिसत नाहीत. हे दोन विरोधी पक्ष राहुल यांच्या न्याहरी बैठकीपासून दूर असताना बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे आपल्या निराळेच सिग्नल देत होते. एकीकडे नितीश यांनी पेगासस प्रकरणात चर्चा व्हायला हवी, असे स्पष्ट सांगून 'मला गृहीत धरू नका' हा त्यांचा आवडता संदेश त्यांनी भाजपनेतृत्वाला दिला. त्याचवेळी, सगळे विरोधी नेते एकत्र भेटत असताना शरद पवार हे सहकार खाते सांभाळणाऱ्या गृहमंत्री अमित शहा यांना भेटून महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रापुढील अडचणी त्यांना समजावण्यात गुंतले होते! पवार-शहा यांच्या भेटीचा विषय महत्त्वाचा असला तरी तिचे टायमिंगही तितकेच लक्षणीय म्हणावे लागेल. सध्या राष्ट्रीय राजकारणात शिवसेनेचा आवाजही महत्त्वाचा ठरत असून त्याचे बरेचसे श्रेय संजय राऊत यांना द्यावे लागेल. त्यांची राहुल गांधी यांच्याशी झालेली व्यक्तिगत भेट आणि मंगळवारच्या बैठकीतला सहभाग, यातून 'आम्ही तुमच्या विरोधातच आहोत आणि तसेच राहू' असा एक संदेश भाजपच्या दिशेने जातो आहे. मध्यंतरी राजधानीत झालेल्या मोदी-ठाकरे भेटीने जे वातावरण निर्माण झाले, तेही या निमित्ताने पुसले जात आहे. देशाच्या सत्तेच्या गणितात उत्तर प्रदेश हा प्रांत जसा महत्त्वाचा तसाच ४८ खासदार असणारा महाराष्ट्रही महत्त्वाचा आहे. विरोधकांच्या गेल्या बैठकीवर तृणमूल काँग्रेसने बहिष्कार घातला होता. तसा तो यावेळी घातला नाही, ही बाबही लक्षात घ्यावी लागेल. या बैठकीत डावे पक्ष असले तरी तृणमूलला आता त्याने काही फरक पडत नसावा. हे विरोधी ऐक्य टिकवायचे असेल तर राहुल गांधी यांना सध्याची क्रियाशीलता पुढची तीन वर्षे अशीच कायम ठेवावी लागेल. केंद्र सरकार आणि ते चालविणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा हे या विरोधकांच्या एकत्रित आवाजाला विधायक प्रतिसाद देतात का, हे संसदेत समजेल. 'पेगासस'वर चर्चा होऊ देणे, हाच तो विधायक प्रतिसाद असणार आहे.

# वीज महावितरणचा अजब कारभार, दांड आदिवासी वाडीवर विद्युत खांबाला लाकडाचा आधार

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात वऱ्हाड-जांभुळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील दांड आदिवासी येथील विजेचे खांब जीर्ण झाले असून मोडकळीस आले आहेत. यातील एका विजेच्या खांबांना चक्क लाकडाचा तात्पुरता आधार देण्यात आला आहे. परिणामी मोठी दुर्घटना घडण्याचा धोका आहे. बुधवारी (ता.४) याबाबत ग्रामस्थांनी महावितरण विरोधात संताप व्यक्त करत धोकादायक खांब बदलण्याची मागणी केली.

याकडे गंभीर बाबीकडे विद्युत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोष आहे. दांड अदिवासीवाडीत सुमारे ७० घरांची वस्ती आहे. या गावात बसविलेले विजेचे खांब ३० ते ४० वर्षे जुने आहेत. अनेक विजेचे खांब गंजले असून वाकले आहेत. परिणामी त्यांना लाकडाचा आधार देण्यात आला आहे.

हा धोकादायक विद्युत खांब बदलण्यात आला नाहीतर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. खांबांवरील विद्युत तारा घरांवर धोकादायकरित्या लोंबकळत आहेत. पावसाळ्याचे दिवस असल्याने मुसळधार पावसामध्ये हे विजेचे खांब कोसळून जीवितहानी होण्याची शक्याता दांडअदिवासीवाडी ग्रामस्थ शंकर गजानन पवार यांनी व्यक्त केली.

या धोकादायक विजेच्या खांबांबाबत वारंवार विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. मात्र अजूनही धोकादायक विजेचे खांब बदलण्यात आलेले नसल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे. त्यामुळे धोकादायक विद्युत खांब लकर लवकर बदलण्यात यावे अशी मागणी दांड अदिवासीवाडीतील ग्रामस्थांनी केली आहे.



# बेकायदेशिरपणे बायो डिझेल विक्री करणाऱ्या दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

इंधनाचे दिवसेंदिवस भाव वाढत असल्याने अनेक वाहन चालक पर्यायी इंधनाचा वापर करत आहेत. उरण मध्ये देखिल अशा पर्यायी आणि स्वस्त इंधनाची विक्री बेकायदेशिरपणे होत आहे. अशाच प्रकारे बेकायदेशिरपणे बायोडिझलची विक्री करणाऱ्या दोन आरोपींना उरण पोलिसांनी अटक केली आहे.

सुरज हैबत डेंबर (२४) रा. मुळेखंड आणि हर्षल अशोक म्हात्रे (३७) रा. मुळेखंड अशी या आरोपींची नावे आहे. हे दोघे उरण चारफाटा येथील बिन्नी गॅरेज जवळ एका टेम्पोमध्ये बायोडिझेल विक्री करण्यासाठी आले असताना पोलिसांनी त्यांना रंगेहाथ पकडले.

या बाबत त्यांच्याकडे विचारणा केली असता त्यांचे जवळ डिझेल विक्रीचा कोणताही परवाना नव्हता त्यामुळे बेकायदेशिर साठवणूक आणि विक्री करण्याप्रकरणी पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून १५ लाख रूपये किंमतीचा टेम्पो, एक स्कॉर्पिओ कार, एक मोटार टेम्पो, ३५ लिटर बायोडिझेल आणि ४५ लिटर बायोडिझल इंडस्ट्रियल ऑईल असा मुद्देमाल जप्त केला आहे.

त्यांच्या विरोधात उरण पोलिस ठाण्यात कलम २८५, ३३६ आणि ३४नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून उरण पोलिस अधिक तपास करत आहेत.

# कर्जत तालुक्यातील सांगवी गावाला दरडींचा धोका

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील खांडपे ग्रामपंचायत मधील सांगवी गावाला दरडी कोसळण्याचा धोका आहे. गावाच्या मागे असलेला डोंगर भूस्खनन होऊन गावावर कोसळण्याची भीती ग्रामस्थांना असल्याने स्थानिक ग्रामपंचायत मधील रहिवासी रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी डोंगर भागाची पाहणी केली.



खांडपे ग्रामपंचायत हद्दीतील मौजे सांगवी गावाला भुस्खलनाचा धोका असल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वा-तावरण निर्माण झाले आहे. २९ जुलै २०२१ ते दिनांक एकऑगस्ट २०२१ रोजी पश्चिम घाट माथ्यावर अतिवृष्टी होण्याची शक्यता असल्याबबात शासनाने सूचित केले आहे. कर्जत तालुक्यातील भारतीय भूवैज्ञानीक सर्वेक्षण विभागाने कळविले प्रमाणे भुस्खलन होणाऱ्या गावांची यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी संबंधित प्रशासकीय यंत्रनेस गावात भुस्खलनाचा धोका असल्यामुळे गावातील नागरिकांस सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची कार्यवाही करण्यास सूचित केले आहे.

त्या यादीत असलेल्या सांगवी गावचे नाव असून डोंगराच्या कुशीत असलेल्या त्या डोंगरभागाची पाहणी स्थानिक ग्रामस्थ यांच्यासोबत रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी पाहणी केली.आपल्या गावाच्या नावाचा समावेश भूस्खनन होणाऱ्या गावात असल्याने ग्रामस्थ घाबरले आहेत. त्यामुळे संबंधित गावाची माहिती सुधाकर घारे यांनी रायगड जिल्हाच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांच्या कानावर घातली. त्यावेळी पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी यांना सोबत घेऊन येत संबंधित वस्तुस्थितीची पाहणी करण्याचे आश्वासन दिले आहे. ग्रामस्थ यांनी नंतर गावाच्या संभाव्य धोक्याबद्दल कर्जतचे माजी आमदार सुरेश लाड यांची भेट घेऊन या प्रकरणी तात्काळ लक्ष घालण्याची मागणी करण्यात आली.

# जि.प.शाळा चरई गौळवाडी आदिवासी वाडी विद्यार्थ्यांना युनिफॉर्म वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील रा.जि.प.शाळा चरई गौळवाडी आदिवासीवाडी येथील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म व चप्पल वाटप शनिवार दिनांक ३१ जुलै रोजी मुंबईतील उद्योगपती श्री.एल.वी.केशव यांच्या आर्थिक सहकार्याने व कृष्णाजी महाडीक नाना पालकर स्मृती चॅरीटेबल मुंबई ट्रस्टचे व्यवस्थापक व रायगड भूषण पुरस्कार प्राप्त समाज सेवक यांच्या माध्यमातून शाळेत आदिवासी समाजाची १०० विद्यार्थी आहेत.

मागील वर्षी विद्यार्थी पट २१ होता या शैक्षणिक वर्षात २८ पट झाला आहे. प्राथमिक शाळेत पालकांचा कल वाढत आहे. या शाळेतील विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता मुलांमध्ये शिक्षणाची अधिक आवड निर्माण व्हावी. या उदात्त हेतुने व कोरोना काळात पालकांची आर्थिक परिस्थिती खुप बिकट आहे. अशा परिस्थितीत मुलांना प्रत्येकी २ ड्रेस व पॅरागॉन चप्पल कृष्णा महाडीक समाज सेवक यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

त्यावेळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय हीलम शाळेच्या मुख्याध्यापक श्रीम.कल्याणी वाजे, तसेच सहकारी शिक्षक ढोले सर तसेच गावचे अध्यक्ष गणपत कोळी व सर्व ग्रामस्थ व पालक वर्ग उपस्थित होते.




# माणगाव येथील दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) च्या न्यायिक अधिकाऱ्याच्या निवासस्थानासाठी भाडेतत्वावर जागा घेण्यास मा.मुंबई उच्च न्यायालयाची मान्यता

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), माणगाव या न्यायालयाच्या न्यायिक अधिकाऱ्याच्या निवासस्थानासाठी भाडेतत्वावर जागा घेण्यास मा.उच्च न्यायालयाने विशेष बाब म्हणून मान्यता दिली आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालयाने माणगाव येथे दिवाणी न्यायाधीश, (वरिष्ठ स्तर) न्यायालय सुरू करण्याकरिता नुकतीच तत्वतः मान्यता दिली होती. हे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी बार असोसिएशनचे पदाधिकारी, सदस्य व सर्वसामान्य पक्षकारांची मागणी पूर्ण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचेच यश आहे.

खासदार सुनिल तटकरे यांनी ते स्वत: राज्य मंत्रिमंडळात मंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात माणगाव येथे अतिरिक्त जिल्हा न्यायालय स्थापन करण्यासाठी अथक परिश्रम घेतले होते.

त्यांच्या प्रयत्नांमुळेच माणगाव अतिरिक्त जिल्हा न्यायालयाची इमारत व माणगाव येथे जिल्हा न्यायालय सुरू झाले. माणगाव, श्रीवर्धन, रोहा व सुधागड-पाली येथील बार असोसिएशनमार्फत माणगाव येथे दिव-ाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय सुरू करण्याकरिता विधी व न्याय राज्यमंत्री तथा पालकमंत्री आदिती तटकरे यांच्याकडे वे-ळोवेळी पाठपुरावा करण्यात आला होता. त्यांनी शासनाकडे वस्तुस्थिती मांडून जनतेच्या व सर्वसामान्य पक्षकारांना न्याय मिळवून देण्याकरिता माणगाव येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्याकरिता शासनाकडून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले. माणगाव येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय कार्यरत झाल्यानंतर महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव, तळा, रोहा व पाली या तालुक्यांमधील जनतेला याचा लाभ होणार आहे.

# पाण्याच्या बाटलीवरुन मारामारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पाण्याची बाटली उधार मागितली असता तू नेहमीच सामान उधार घेवून जातो असे सांगून उधारीवर सामान मिळणार नाही, असे बोलून दुकानदार व ग्राहकामध्ये मारामारी झाल्याची घटना शहरातील लक्ष्मी वसाहत झोपडपट्टी परिसरात घडली आाहे.

मुस्ताक बागवान (३७) याने या ठिकाणी व्यवसाय करणारे खंडू राऊत (३७) याच्याकडे पाण्याची बाटली उधार मागितली असता तू नेहमीच सामान उधार घेवून जातो आज उधारीवर सामान मिळणार नाही असे बोलत असताना त्या दोघांमध्ये बोलाचाली होवून हाता बुक्क्याने मारहाण झाली. म्हणून याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

# दोघांना अटक

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

येथिल जासई साईलिला बार जवळ बेकायदेशिरपणे तलवार बाळगणाऱ्या दोघांना उरण पोलिसांनी अटक केली आहे. बिरूदेव विठ्ठल उतरे (३३) रा. मानखूर्द आणि गणेश रामचंद्र यादव (३१) रा.जसखार अशी या आरोपींची नावे आहेत.

# श्री साईनारायणबाबा आश्रम पनवेलतर्फे पुरग्रस्तांना मदत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेल्या आठवड्यात कोकणात पडलेल्या मुसळधार पावसामुळे महाड, खेड, चिपळूण परिसरातील नागरिकांची अवस्था अत्यंत बिकट झाली होती. त्यांना मदतीचा हात म्हणून पनवेल येथील श्री साईनारायणबाबा आश्रम पनवेलतर्फे जीवनावश्यक वस्तूंसह औषधांचे वाटप करण्यात आले.

श्री साईनारायणबाबा आश्रम पनवेल व श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून या संस्थेचे पदाधिकारी रामलाल चौधरी व राम थदानी तसेच इतर सहकाऱ्यांनी मिळून या कोकणातील भागात जावून त्या ठिकाणी जीवनावश्यक वस्तू, औषधे व इतर महत्वाच्या सामानांचे वाटप यावेळी केले आहे. आगामी काळात सुद्धा अशाच प्रकारची मदत येथील बाधितांना करणार असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खारघरमधील कोपरा खाडीत अवैधरित्या वाळू उपसा ; पनवेल तहसीलची कारवाई

त्याअनुषंगाने मंडळ अधिकारी संतोष कचरे, एल. आर. राऊळ, मनीष जोशी, तलाठी सज्ञा अंकिता लोखंडे, संजय बिक्कड यांनी खारघर येथील कोपरा खाडी रेल्वे पुलाजवळ खारघर पोलिसांच्या साथीने धाड टाकली.

खारघर येथील कोपरा खाडीमध्ये रेल्वे पुलाजवळ पथकाने केलेल्या पाहणीत अनधिकृतपणे सक्शन पंपाच्या साहाय्याने रेती उत्खनन करून तीन कोंड्यात भरून ठेवलेली ७ ते ९ ब्रास रेती आढळून आली. सदर पथकातील अधिकाऱ्यांनी जेसीबीच्या मदतीने कोंड्या उद्ध्वस्त केल्या तसेच कटरच्या साहाय्याने सक्शन पंपचे तुकडे केले. तसेच खाडी मार्गावर जाणारे अंतर्गत रस्ते जेसीबीच्या साहाय्याने चरी खोदून बंद करण्यात आले. कारवाईनंतर अज्ञात व्यक्तीवर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## पेणमध्ये भाजपला खिंडार ; विष्णूभाई पाटील यांचा पुन्हा शिवसेनेत प्रवेश

झेंडा स्वीकारला आहे.

विष्णूभाई पाटील हे तळागाळातील जनतेचे प्रतिनिधित्व करणारे कार्यकर्ते असून जेएसडब्ल्यू कंपनी विरोधात लढा देऊन ४० गावांना पिण्याचे पाणी दिले होते. तसेच शिवसेनेच्या माध्यमातून जनतेच्या तसेच कामगारांच्या अनेक प्रश्नांवर आंदोलने करुन त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या शिवसेनेतील स्वगृही प्रवाशाने रायगड मधील विशेषतः पेण मतदार संघातील शिवसेनेची ताकद वाढली आहे. या प्रवेश कार्यक्रमास उद्योग मंत्री सुभाष देसाई, जिल्हाप्रमुख तथा आमदार महेंद्र दळवी, माजी सभापती संजय जांभळे, तालुकाप्रमुख अविनाश म्हात्रे यांच्यासह पेण, पाली येथील शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्री.भाकरे सो.कोर्ट

श्री.विरेंद्र त्रिं. कुळकर्णी, पनवेल
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.७७४/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०९/२०२१

श्री.अरुण दत्तात्रय गद्रे
वय : ६५ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.चिंतामणी मंगल कार्यालय,
प्लॉट नं.५७/४, तालुका पोलीस स्टेशन जवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी त्यांना कै.शालिनी दत्तात्रेय गद्रे यांचे दि.०४/०४/२०१५ रोजीचे अंतिम मृत्यूपत्राप्रमाणे मिळणाऱ्या खालील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अर्जदार यांनी सदरचे प्रोबेट दाखला मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै.शालिनी दत्तात्रेय गद्रे यांचे मालकीच्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील फायनल प्लॉट नं.५७, सब प्लॉट नं.४, क्षेत्र ४८७ चौ.मी. पैकी २२५.५ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड व त्यावरील तळमजला अधिक पहिला मजला अशा वर्णनाची मिळकत कै. शालिनी दत्तात्रेय गद्रे यांचे मालकीची होती व आहे.**

वर अर्जदार ह्यांनी कै.शालिनी दत्तात्रेय गद्रे यांचे दि.०४/०४/२०१५ रोजीचे अंतिम मृत्यूपत्रान्वये मिळणाऱ्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत कोणतीही हरकत असल्यास व ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.अरुण दत्तात्रेय गद्रे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.शालिनी दत्तात्रेय गद्रे यांचे पश्चात प्रोबेट दाखला मिळण्यास पात्र आहेत, असे सिद्ध झाल्यास त्यांना हे प्रोबेट दाखला मंजूर करेल.

आज दि.३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## ट्रकच्या धडकेत एका पादचाऱ्याचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव वेगाने ट्रक चालवून एका पादचाऱ्याला धडक मारुन त्यात तो गंभीररित्या जखमी झाल्याने मयत झाल्याची घटना पनवेल जवळील चिंचवण गावाच्या हद्दीत घडली आहे.

चिंचवण गावाच्या हद्दीतील नाल्यावरील ब्रिजवरुन आरोपी मेहबुब खान ट्रक चालक हा भरधाव वेगाने जात असताना त्याने रमेश कातकरी (४०) याला धडक मारुन त्यात तो गंभीररित्या जखमी होवून मयत झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## शिवशक्ती मित्र मंडळानी केली पूरग्रस्तांना मदत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शिवशक्ती मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील खेड व परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष गोविंदा सुतार , प्रवीण पोवार, संतोष तळेकर, प्रशांत नरसाळे, समीर कदम ,कुमार पडवळ, नीलेश समेळ, अनिकेत जाधव, जयंवत दसवडकर, यांच्या नेतृत्वाखाली खेड येथे पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आमदार योगेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली खेड येथे व जेथे जेथे गरज आहेत त्याची माहिती घेऊन नगरसेविका सीमा वंडकर यांच्यासह वाटप करण्यात आले.



## काशिद ग्रामपंचायतीतर्फे शेतकऱ्यांना मोफत खत वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रुप ग्रामपंचायतीतर्फे सर्वे, चिकणी व काशिद गावातील शेतकऱ्यांना मोफत खताचे वाटप करण्यात आले. ग्रामपंचायत सरपंच नम्रता कासार-खेडेकर, उपसरपंच मयुरी धार्वे, सदस्य विलास मोरे, अंकुश चाचे, संतोष राणे,वर्षा दिवेकर,निलम महाडिक, जान्हवी दिवेकर,शुभ्रा कासार,तुळसा पवार, नरेश धार्वे आदी. मान्यवर यावेळी उपस्थित होते.यावेळी शेतकऱ्यांना मोफत युरीया खताचे वाटप करण्यात आले. मुरुड तालुका कृषी विभागाचे कृषी सहायक आदिराज चौलकर व कृषी मित्र सुशील खोपकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## बाळसई येथे अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

ऐनघर ग्रामपंचायतीच्या ग्रा. पं.सदस्या अर्चना भोसले यांच्या प्रयत्नातून ऐनघ ग्रामपंचायतीच्या फंडातून बाळसई येथे अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन नुकतेच बाळसई गावाचे उपाध्यक्ष रणजित शेडगे यांच्या हस्ते पार पडले.

या प्रसंगी माजी ग्रामपंचायत सदस्य सचिन भोसले, निवृत्त आधिकारी अनंता मुंडे, सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र तेलंगे, प्रतिष्ठीत नागरीक रघुनाथ मुंडे, माऊली मोरे, गावाचे खजिनदार यशवंत भोसले, दत्ता पाटेकर, अशोक पाटेकर, सुनिल मोरे, प्रमोद पाटेकर, मनोज तेलंगे, बबन तेलंगे, मनोज भोसले आदी उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना उपाध्यक्ष रणजीत शेडगे म्हणाले की यापुढे बाळसई गावातील विकास कामे ही वेगाने होणार असून एक कर्तत्वान सदस्य निवडून दिल्यामुळे गावात विकासाचे पाऊल पडताना दिसत आहे. तसेच माजी ग्रा.सदस्य सचिन भोसले यांनी गावाने सदस्य म्हणून अर्चना भोसले यांना निवडून दिले आहे त्यांचे ऋण सदैव असून ते विकासकामांच्या माध्यमातून फेडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचा मानस व्यक्त केला.

# मुरुड तालुक्यातील पूरग्रस्तांना मनसेने दिला मदतीचा हात !

### सौ.लिना बाळा नांदगावकर यांच्या हस्ते जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार युवा नेते अमित ठाकरे, बाळा नांदगावकर व एकलव्य फाउंडेशनच्या अध्यक्षा सृष्टी नांदगावकर यांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रातील पुरग्रस्तांना मदतीचा हात दिला जात असून रायगड तसेच मुरुड तालुक्यातील आदाड, वालवटी, उसरोली, खारदोडकुळे, मजगांव, वावे-आदिवासीवाडी व मुरुड येथील पूरग्रस्त-गरजूंना सौ.लिना बाळा नांदगावकर व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.



सौ.लिना नांदगावकर व पदाधिकाऱ्यांनी तालुक्यातील पूरग्रस्त आदाड वालवटी उसरोली खारदोडकुळे मजगांव व मुरुड मधील पूरग्रस्त भागाची पाहणी करून पूरग्रस्तांना दिलासा दिला. यावेळी त्यांच्या हस्ते पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे किट, चटई, ब्लँकेट-चादर, कपड्यांचे वाटप करण्यात आले तर वावे-आदिवासीवाडी व उसरोली येथील गरजूंना मदत जीवनावश्यक वस्तू-भांड्यांच्या किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी सौ.लिना नांदगांवकर, विभाग अध्यक्षा सौ. सुप्रिया दळवी, महिला सचिव सौ. ग्रेसी सिंग, सायन-कोळीवाडा विभाग अध्यक्ष अनंत कांबळे, उपाध्यक्ष/ विभाग अध्यक्ष नंदकुमार चिले, लांजा संपर्क अध्यक्ष चंद्रकांत गुरव, मनविसे राज्य उपाध्यक्ष अविनाश किरवे, रोजगार विभाग संघटक सचिन चिकाटे, रोजगार उपविभाग संघटक दिपक कासले, रविदास वगारे, योगेश दांडेकर, अंकुश कारंडे तसेच मनसे तालुका अध्यक्ष शैलेश खोत, सचिव राजेश तरे, माजी तालुका अध्यक्ष अरविंद गायकर, तालुका उपाध्यक्ष प्रशांत भाटकर, विभाग अध्यक्ष गजानन भोईर, मुन्ना उल्डे, शाखा अध्यक्ष राहुल गोसावी, सिद्धेश खोपकर, कल्पेश तांबडे, महेन्द्र कांबळी, स्वागत मकाजी, प्रतिक कणगी, अनिकेत आयरे, संतोष धोंड, त्रिशूल कानुगोजे यांसह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## पूरग्रस्तांसाठी सुधागड राष्ट्रवादी युवक काँग्रेसची धाव



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मदत नव्हे माझे कर्तव्य या उद्देशाने सुधागड राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाच्या शेकडो युवकांनी पूरग्रस्तांना नुकतेच जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. तसेच श्रमदान करून साफसफाई केली. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आला. यावेळी पूरग्रस्तांच्या समस्या देखील जाणून घेण्यात आल्या.

या मोहिमेस आमदार अनिकेत तटकरे व राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्षा गीता पालरेचा यांचे मार्गदर्शन लाभले. राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे यांनी ग्रुप ग्रामपंचायत नाडसुर येथील ग्रामस्थ व सुधागड तालुक्यातील शेकडो युवकांना घेऊन महाड येथील पूरग्रस्त भागातील साफसफाई केली.

तसेच मदत म्हणून नाही तर कर्तव्य समजून येथील पूरग्रस्तांना आधार मिळावा यासाठी अनेक जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. याबरोबर त्यांचे दुःख जाणून घेतले आणि तळीये दरड ग्रस्तांना श्रद्धांजली वाहिली.

## विठ्ठल आयरे राज्य परिवहन खात्यातून सन्मानाने सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

राज्य परिवहन महामंडळ रोहा आगारात वाहक या पदावर प्रामाणिकपणे आपल्या सेवेचा कार्यकाल पुर्ण करून मालसई गावचे प्रतिष्ठित नागरिक विठ्ठल गौरु आयरे वयोमानानुसार सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झाले आहेत.

गेली ३४ वर्षे कोलाड, तळा,रोहा व नागोठणे येथे हंगामी एसटी डेपो कंट्रोलर व वाहक या पदावर कार्यरत होते.मालसई या छोट्याशा खेडेगावातून २५ फेब्रुवारी १९८८ रोजी ते रोहे डेपोमध्ये वाहक या पदावर आपल्या सेवेमध्ये रूजू झाले.आपली प्रामाणिक सेवा व सहकार्याची भावना यामुळे त्यांचे सर्वांशी सौदार्याचे व स्नेहपूर्वक संबंध होते.तर एक उत्कृष्ट सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणून व त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना महामंडळाकडून वेळोवेळी सन्मानितही करण्यात आले.

वाहक या पदावर व हंगामी कंट्रोलर पदावर कार्यरत राहून सन्मानाने सेवानिवृत्त झालेल्या विठ्ठल आयरे यांच्या उत्कृष्ट व अविरत सेवेबद्दल त्यांच्या परिवाराकडूनही आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात सन्मानचिन्हे, शाळ व श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.यावेळी राजेंद्र कामथे,प्रदीप खेरटकर,सुजीत मरवडे,विक्रम आयरे व आयरे परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## चिरनेर पंचक्रोशीतील भातशेतीचे कृषी अधिकाऱ्यांकडून पंचनामे पूर्ण

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील चिरनेर पंचक्रोशीतील गावागावात महापुराच्या पाण्याने भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. चिरनेरचे कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील, सरपंच संतोष चिर्लेकर यांनी उरण तालुका कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना चिरनेर गावात बोलावून त्यांना प्रत्यक्ष शेताच्या बांधावर नेऊन त्यांच्याकडून भातशेतीच्या नुकसानीचे पंचनामे कृषी अधिकारी उमेश गाताडी यांनी करून घेतले आहेत.

उरण तालुक्यातील चिरनेर गावाला महापुराचा मोठा तडाखा बसला त्यामुळे घरात पाणी शिरून अन्नधान्याची व इतर चीजवस्तूंची पूर्ण नासाडी झाली आहे यात भात शेतीत पाणी घुसून शेते दुथडी भरून वाहत होती तर डोंगर दर्यातील माती दगड पाण्याच्या प्रवाहाबरोबर येऊन भाताची लागवड केलेल्या काही शेतात येऊन भात शेती गाडून गेली आहे. यात भात शेतात पाणी घुसून शेते दुथडी भरून वाहत होती.

त्यामुळे शेतकऱ्यांची भात शेती कूजूनही गेली आहे त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे या भातशेतीच्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळावी यासाठी चिरनेरचे कृषी मित्र प्रफुल्ल खारपाटील सरपंच संतोष चिरलेकर यांनी उरण तालुका कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना शेताच्या बांधावर नेऊन त्यांच्याकडून पंचनामे करून घेतले आहेत. यावेळी कृषी अधिकारी उमेश गाताडी परिसरातील शेतकरीही उपस्थित होते.

---

मा.गोडसे साहेब

अ‍ॅड.हेमा भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल

चौ.अर्ज क्र.८५६/२०२१
नि.नं.७
ने.ता.१५/०९/२०२१

१) श्री.विजय रावसाहेब जाधव
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) श्री.राजेंद्र रावसाहेब जाधव
वय : ५० वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.संजय रावसाहेब जाधव
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.केएल ६, बिल्डींग नं.३, रुम नं.६,
सेक्टर ३ ई, कळंबोली नोड, कळंबोली, ता.पनवेल
४) श्री.अशोक रावसाहेब जाधव
वय : ६२ वर्षे, व्यवसाय : नोकरी
राहणार ७३, लालबाग, ४०००१२
५) सौ.विद्या सुहास प्रभु
वय : ६० वर्षे, व्यवसाय :
रा.सी २०७/२०८, शकुंतला कृपा सोसायटी,
मेंटल हॉस्पिटल समोर, वागळे ईस्टेट
ठाणे ४००६०४ — अर्जदार

| शहर | सेक्टर | सदनिका क्र. | किंमत |
|---|---|---|---|
| कळंबोली | सेक्टर ३ | केएल ६, बिल्डींग नं.३, सेक्टर ३ ई, कळंबोली, रुम नं.६ | ९६,२५०/- |

सदरहू वरील अर्जदार क्र.१ व ४ हे कै.रावसाहेब सखाराम जाधव यांची मुले आहेत व अर्जदार क्र.५ ही त्याची विवाहित मुलगी आहे. कै. रावसाहेब सखाराम जाधव यांचे निधन दि.०६/०३/२०२१ रोजी पनवेल येथे झाले आहे. कै.रावसाहेब सखाराम जाधव यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिकेमध्ये केलेली आहे. पनवेल महानगरपालिकेने त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.४/८/२०२१ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्याया, पनवेल**

---

मे.मुजावर सो

प्रो.जमा.६-२५ — अर्जदाराचे वकील दिनेश द. पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८७५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०९/२०२१

कै.बाळाराम उर्फ बाळा बगाराम म्हात्रे (मयत तर्फे वारस)
१) श्रीमती.जयश्री बाळाराम उर्फ बाळा म्हात्रे (पत्नी)
वय : ४६ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.अर्जुन बाळाराम उर्फ बाळा म्हात्रे
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.प्रवीण बाळाराम उर्फ बाळा म्हात्रे
वय : २१ वर्षे, धंदा : नोकरी
वरील १ ते ३ रा.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.अर्चना मंगेश म्हात्रे
पुर्वाश्रमीची अर्चना बाळाराम उर्फ बाळा म्हात्रे
वय : २७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.बाळाराम उर्फ बाळा बगाराम म्हात्रे हे दि.१५/०४/२०२१ रोजी मौजे : धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून सदरहू मिळकत ही त्यांची आई कै.शांताबाई बगाराम म्हात्रे यांचे नावे असून कै.शांताबाई बगाराम म्हात्रे यांच्या मृत्यूपश्चात बाळाराम उर्फ बाळा बगाराम म्हात्रे यांचे नावे होणे गरजेचे होते. परंतु बाळाराम उर्फ बाळा बगाराम म्हात्रे हे देखील दि.१५/०४/२०२१ रोजी मयत असून सदरहू मिळकतीला कै. शांताबाई बगाराम म्हात्रे यांचे नाव आहे. त्यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| ४८२ | पनवेल | ६०२ | १ (२) | ०-११-८ |

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन आहे.

कै.बाळाराम उर्फ बाळा बगाराम म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हेच वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०४/०८/२०२१ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्याया, पनवेल**

---

## पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | कल्पतरु वॉटर फ्रन्ट को.ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.४९७, ४९८ जुना पुणे हायवे | ०१ मृत सुकलेले अर्धे झाड | पनवेल महानगरपालिका हदकदीतील कल्पतरु वॉटर फ्रन्ट को.ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.४९७, ४९८ येथील सदरचे ०१ मृत सुकलेले अर्धे झाड हे वाहतुकीस अडथळा निर्माण करत आहे. त्यामुळे काही अपघात होवू शकतात. तरी सदरचे ०१ मृत सुकलेले अर्धे झाड हे तोडणेकामी परवानगी बाबत. |
| २ | श्री चामकौर सिंग, एच एन्ड जी टुर्स एन्ड ट्राव्हलस, प्लॉट नं.ई-१११, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई | ०१ शहतुत | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.१११, सेक्टर १२, खारघर नवी मुंबई येथील १ शहतुत हे झाड घरासमोर आहे. सदरचे झाड हे मृत अवस्थेत व ते कधीही पडू शकते. त्यामुळे मालमत्तेचे व जिवीत हानी होवू शकते. तरी १ शहतुताचे झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |
| ३ | सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सा.बां. उपविभाग क्र.१ पनवेल | ०१ करंज | सा.बां.उपविभाग क्र.१ पनवेल या कार्यालयाच्या आवारातील मुख्य रस्त्यालगत असलेले मोठे झाड पडण्याची शक्यता आहे. तरी सदरील झाड लवकरात लवकर आपणा मार्फत तोडणेबाबत विनंती आहे. सदरील झाड हे मुख्य रस्त्यालगत असल्याने तेथे सतत रहदारी सुरू असते. तसेच बाजूस बैठी चाळ इमारत असून त्यामध्ये रहिवाशी राहत आहेत. सदरील झाड बैठी चाळ इमारतीवर कोसळले बाबतची कधीही दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. त्या कारणाने १ करंज झाड तोडणेकामी परवानगी मिळणे बाबत. |
| ४ | श्री.चंद्रकांत भिवा पाटील, मु.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड | १ नारळ | पनवेल महानगरपालिका हद्दीतील मु.नावडे, ता.पनवेल येथील अर्जदार यांच्या घराच्या बाजूला कंपाऊंड लगत नारळाचे झाड आहे. सदर झाड हे ३५ ते ४० फुट उंच असून वादळामुळे वाकलेले आहे. सदरचे झाड हे श्री.सतीश पाटील यांचे घरावर पडून अपघात होण्याची दाट शक्यता आहे. तरी १ नारळाचे झाड तोडणेकामी परवानगीबाबत. |
| ५ | श्रीम.श्वेता क्रिष्णा, सेक्रेटरी, जलवायु डिफेन्स इन्क्लेव को. ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.२०, से.२०, खारघर | ०१ बदाम ०१ रेन ट्री | पनवेल महानगरपालिका हद्दीतील जलवायु डिफेन्स इन्क्लेव को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं.२०, से.२०, खारघर या सोसायटीच्या आवारातील ०१ बदाम व ०१ रेन ट्री अशी दोन झाडे ही कंपाऊंड वॉल लगत असल्याने कंपाऊंड वॉलला धोका असल्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी ०१ बदाम व ०१ रेन ट्री अशी दोन झाडे तोडणेकामी परवानगी बाबत. |
| ६ | सेक्रेटरी, निल पार्क को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.९४/३, ४, ५, ६, ७ तालुका पोलीस स्टेशन बाजूला, पनवेल व सौ.सुरेखा विलास मोहोकर, मा.नगरसेवक, पमपा १०१, सुशिल गार्डन २ ठाणा नाका रोड, पनवेल | १ करंज | पनवेल महानगरपालिका हद्दीतील निल पार्क को. ऑप.हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट नं.९४/३, ४, ५, ६, ७ तालुका पोलीस स्टेशन बाजूला, पनवेल या सोसायटीच्या मेनगेटच्या दोन्ही बाजूला मोठ मोठी झाडे वाढलेली आहेत. त्यापैकी काही झाडे तोडण्यात आली असून त्यातील एक झाड सोसायटीच्या कंपाऊंड वॉलला चिकटलेले आहे. सदर झाडाच्या फांद्या ह्या विजेच्या तारेवर व सोसायटीच्या आवारात आलेल्या आहेत. समोर कोर्ट असल्यामुळे त्या झाडाखाली रिक्षा व अनेक लोक उभे राहिलेले असतात. पावसाळ्यात वाऱ्यामुळे ते झाड केव्हाही पडू शकते. अशा या धोकादायक झाडामुळे सोसायटीच्या कंपाऊंडची भिंत केव्हाही कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे सोसायटीतील सभासदांच्या जिवीत हानीस धोका निर्माण होवू शकतो. तरी १ करंज झाड तोडणेकामी परवानगी बाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सुचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

पमपा/उद्यान/२१२१/प्र.क्र.११९/३४३/२०२१
दिनांक : ०४/०८/२०२१

**सही/-**
**सहा.आयुक्त**
**तथा**
**वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

# समाजप्रिय डॅशिंग नेतृत्व : आ.प्रशांत ठाकूर

**आमदार प्रशांत ठाकूर नाव घेतले कि डोळ्यासमोर येते विकासमूर्ती. विकासकामांचा डोंगर, सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, राजकारण, अशा क्षेत्रातील समाजप्रिय डॅशिंग नेतृत्व म्हणजेच आमदार प्रशांत ठाकूर.**





माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा समाजसेवेचा वसा समर्थपणे चालवित समाजाला आवश्यक सेवा देण्याचे काम भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष तरुण तडफदार, अभ्यासू, लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून सातत्याने होत आहे. सामान्य कार्यकर्ता ते भाजप जिल्हाध्यक्ष, आमदार, सिडको अध्यक्ष यासह अनेक सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील पदे त्यांनी भूषविली असले तरी 'कितीही मोठा झालो तरी मी सामान्य कार्यकर्ता आहे' हीच समाजहिताची भूमिका त्यांनी जोपासली त्यामुळे खऱ्या अर्थाने कर्तृत्वाने ते मोठे झाले. त्यामुळे 'मूर्ती लहान पण कीर्ती महान' अशी टॅगलाईन त्यांच्या नावाला लागली आहे.

अवघ्या कोकणचे समर्थ नेतृत्व असलेल्या आमदार प्रशांत ठाकूर यांनी कोकणचे प्रवेशद्वार असलेल्या पनवेलला

त्यांना आधार देण्याचे काम ते सातत्याने करीत असतात. त्यांच्या जवळ असलेला लोकसंग्रह खूप मोठा आहे. पक्षभेद न मानता कुठलाही व्यक्ती येवो त्याचे काम करणे हा त्यांचा कायम ध्येय राहिला आहे. त्यामुळे सामान्य कार्यकर्ता ते नगराध्यक्ष पुढे हॅट्रिक आमदार असा प्रवास



शैक्षणिक, सामाजिक सेवा करण्याचे अबाधित काम त्यांच्याकडून होत आहे. राजकीय नेते शक्यतो कला, साहित्य, क्रीडा या प्रांतापासून चार हात लांब असतात, मात्र आमदार प्रशांत ठाकूर याला अपवाद आहेत. राजकीय स्वार्थासाठी विविध स्पर्धा न भरवता प्रत्यक्ष बारीकसारीक गोष्टीत लक्ष घालून उत्कृष्ट व्यासपीठ निर्माण करीत ते पनवेल आणि











करणारे कोकणातील युवकांचे आदर्श म्हणून त्यांची ख्याती झाली. अनेक ज्येष्ठ नेत्यांचा आशीर्वाद आणि शिकवण लाभल्यामुळे ते नेहमी जोशामध्ये घाईघाईने कोणताही निर्णय न घेता जे काम करायचे ते उत्कृष्ट करायचे असा त्यांचा ध्यास सदैव दिसतो. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत राबविले जाणारे अनेक उपक्रम आणि त्यांचे नियोजन पाहिले असता, त्या उपक्रमामागील असणारी त्यांची तळमळ दिसून येते. सकाळी लवकर त्यांचा दिनक्रम सुरु होतो. आपल्याकडे आलेल्या नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या निकाली काढणे त्यानंतर दिवसभर पायाला



प्रशांत ठाकूर यांनी सढळ हस्ते मदत आणि धीर देण्याचे काम केले असल्याचे संपूर्ण महाराष्ट्राने पहिले आहे. मात्र हे कार्य त्यांनी कधीही सवंग लोकप्रियता किंवा प्रसिद्धीसाठी केले नाही. माणूस आणि माणुसकी म्हणूनच त्यांच्याकडून विधायक कार्य घडत आहे. मागील वर्षी आलेल्या कोरोना व त्यामुळे आलेल्या लॉकडाऊन परिस्थितीत अनेकांना उपाशी राहण्याची वेळ आली होती पण त्यांनी कोणालाही उपाशी राहू दिले नाही. लाखो जणांना कोरडा अन्नधान्य, तयार भोजन, देण्याबरोबरच कोरोना पासून काळजी घेण्याकरिता लाखो जणांना मास्क, सॅनिटायजर सुद्धा दिले. मधल्या काळात कोरोनाची दुसरी लाट आली त्यावेळीही अखंडपणे सेवाकार्य सुरूच ठेवले. या लाटेदरम्यान रुग्णांच्या संख्येत झपाट्याने वाढ होऊ लागली, त्यावेळी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मदत आणि समुपदेशन करण्यासाठी कोविड वॉररूम आणि त्याचबरोबरीने प्राणवायूसाठी ऑक्सिजन कॉन्सिनट्रेटर मशीन रुग्णांना उपलब्ध करून देण्यात आल्या. जुलै महिन्यात महाडला झालेल्या महापूर आणि तळीये गावावर दरड कोसळल्यामुळे महाडकरांवर मोठे संकट आले.

शासन, प्रशासनाचा एकही अधिकारी त्या ठिकाणी पोहोचला नव्हता त्यापूर्वीच आमदार प्रशांत ठाकूर हे राज्य व केंद्रातील नेते मंडळींसोबत आणि जिल्ह्यातील युवकांची फौज घेऊन महाडकरांच्या मदतीसाठी धावून गेले आणि एवढेच नाही तर मदतकार्यासाठी तेथेच तळ ठोकून बसले. कोरडा अन्नधान्य, तयार भोजन, पाणी, अल्पोआहार, मेडिकल किट, कपडे, चादर, ब्लँकेट, टॉवेल, असे विविध

सामुग्री देण्याबरोबरीनेच महाडमधील चिखलाचे साम्राज्य दूर करण्यासाठी यंत्रसामुग्री आणि मनुष्यबळ पुरवून तात्काळ त्यांनी महाडकरांसाठी मदत कार्य सुरु केले. आणि आजही ते कार्य अखंडपणे सुरु आहे. संकट कोणावरही असो ते आपले मानून काम करणे हाच त्यांचा उद्देश कायम राहिला आहे. त्यामुळे त्यांच्याकडून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम होत असते.

सर्व क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांचे भरीव योगदान आहे. अर्थात यामागे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा भक्कम पाठिंबा आहे हे सर्वश्रुत आहे.८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण हा वसाच त्यांनी घालून दिलेला आहे.त्याच मार्गावरुन आमदार प्रशांत ठाकूर वाटचाल करीत आहेत. सतत सर्व समाजाच्या विकासाचा ध्यास घेऊन समाजाला कोणती गरज आहे हे लक्षात घेऊन आमदार प्रशांत ठाकूर ऊन पावसाची तमा न बाळगता दिवसातून १८- १८ तास काम करीत, जनतेचा त्यांच्यावर असलेला विश्वास ते कार्यातून अधिक दृढ करताना दिसतात. डोंगरासारखे त्यांचे कार्य संपूर्ण राज्याने पाहिले आहे, त्यांचे कार्य नेहमीच ऊर्जा देणारे आहे, असे कार्यसम्राट, लोकप्रिय, आणि लोकसेवेचा अखंड वसा घेतलेले आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसाच्या कोटी कोटी शुभेच्छा!



विकासाचे मॉडेल बनविण्याचे त्यांचे स्वप्न सत्यात उतरवले आहे. हेच त्यांच्या लोकप्रियतेचे प्रमुख कारण आहे. राजकीय कार्यकर्त्यांच्या डोक्यावर बर्फ, तोंडात साखर आणि पायाला भिंगरी हवी आणि असेच अपेक्षित असते. याचे मूर्तिमंत उदाहरण आमदार प्रशांत ठाकूर हे आहेत. त्यांचा राजकीय प्रवास प्रेरणादायी आहे. सत्तेत असो व नसो जनतेसाठी सतत काम करायचेच आणि हाच त्यांचा पिंड त्यांना विधायक कार्य करण्याची ऊर्जा देतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की, युवकांच्या हातात देश द्यायचा आहे. त्यासाठी सक्षम युवा नेतृत्व कसे असावे याचे उदाहरण द्यायचे असेल, तर ते आमदार प्रशांत ठाकूर आहेत. लोकांच्या सुख दुःखात धावून जात

भिंगरी लावून सतत वेगवेगळे विषय हाताळणे हे त्यांच्या अंगवळणीच पडले आहे, असे म्हणावे लागेल. सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, आरोग्य, राजकीय, अशा क्षेत्रात आमदार प्रशांत ठाकूर यांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी ठरले आहे. आज पर्यंत त्यांनी केलेली कार्य समाजात आदर्श निर्माण करणारी आहेत. लोकांना सदृढतेचा मार्ग दाखवण्यासाठी नेहमी ते प्रयत्नशील असतात, त्यामुळे या तरुण नेतृत्वाकडून अभ्यासू असण्याची सर्वांनाच अपेक्षा असते. या अपेक्षेला आमदार प्रशांत ठाकूर पुरून उरतात. त्यांच्या सभागृहातील आणि सभागृहाबाहेरील भाषणांतून याची प्रचिती येते. विषयाच्या मुळाशी जाण्याची त्यांची वृत्ती सर्वांना मोहात टाकणारी ठरते. पायाभूत सुविधा, देण्याबरोबरच आरोग्य,

रायगडमधील कलावंत आणि खेळाडू, तसेच साहित्यिकांना प्रोत्साहन देत असतात. स्वतः नवनवीन पुस्तकांचे वाचन करताना ते नेहमी आढळतात. कलेला राजाश्रय मिळाल्यामुळेच रायगड मधील कलावंत उच्च यश संपादन करताना दिसत आहेत. आपल्या धावपळीच्या जीवनात असे कार्यक्रम त्यांना आत्मिक आनंद देत असल्याची कबुली ते नेहमीच देतात. पनवेलला विकासात बदलण्याचे आणि वेळोवेळी संकटकालीन परिस्थितीत लोकांना मदतीचा हात देण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले हे सांगायला कोण्या ज्योतिषाची गरज नाही.

जिल्हा किंवा जिल्ह्याबाहेर आलेल्या नैसर्गिक आपत्ती, आपत्कालीन परिस्थितीत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार

**शब्दांकन : हरेश महादेव साठे**

## फेसबुकवरुन अनोळखी पुरुषासोबत मैत्री करणाऱ्या विवाहितेला भामटयाने घातला २ लाख २२ हजाराचा गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फेसबुकवरुन एका अनोळखी पुरुषासोबत मैत्री करणे कळंबोलीतील एका ३१ वर्षीय विवाहितेला चांगलेच महागात पडले आहे. या विवाहितेने ज्या अनोळखी व्यक्तीसोबत फेसबुकवरुन मैत्री केली, त्या व्यक्तीने पोलीस असल्याचे भासवून विवाहितेला जुनी कार विकत घेवुन देण्याचे व सदरची कार ओला व्यवसायामध्ये लावुन त्याद्वारे तीला पैसे मिळवुन देण्याचे आश्वासन देऊन विवाहितेकडून २ लाख २० हजार रुपये उकळल्याचे उघडकीस आले आहे. विजय गुडरे असे या प्रकरणातील तोतया पोलिसाचे नाव असून कळंबोली पोलिसांनी त्याच्यावर फसवणुकीसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे, तसेच त्याचा शोध सुरु केला आहे.

या प्रकरणात फसवणूक झालेली विवाहिता कळंबोलीत पती व मुलासह रहाण्यास असून पती मजुरी करतो, त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. गत जानेवारी महिन्यामध्ये या विवाहितेच्या फेसबुकवर विजय गुडरे याने फ्रेंड रिक्वेस्ट पाठविली होती. विवाहतेने त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारल्यानंतर विजय गुडरे याने विवाहितेसोबत मॅसेंजरवरुन चॅटींगला सुरुवात केली. दोन महिन्यानंतर दोघांनी एकमेकांना आपले मोबाईल नंबर दिल्यानंतर त्यांनी मोबाईलवरुन बोलण्यास सुरुवात केली. यादरम्यान, विजय गुडरे याने तो पोलीस असल्याचे व तो कामोठे येथे रहाण्यास असल्याचे विवाहितेला सांगितले होते. त्यावेळी विवाहितेने तीची आर्थिक परिस्थीती खुपच हालाखीची असल्याचे सांगितल्यानंतर भामटय़ा विजय गुडरे याने विवाहितेला जुनी कार विकत घेऊन देण्याचे व सदर कार ओला कंपनीत लावुन त्याद्वारे तीला पैसे मिळवुन देण्याचे आश्वासन तीला दिले.

याबाबत विवाहितेने तयारी दर्शविल्यानंतर विजय गुडरे याने विवाहितेकडे कार विकत घेण्यासाठी १ लाख रुपयांची मागणी केली. विवाहितेने त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून आपल्याकडील दागिने सोनाराकडे गहाण ठेवुन प्रथम १ लाख रुपये विजय गुडरे याच्या बँक खात्यावर दोन टप्प्यात पाठवुन दिले. त्यानंतर देखील विजय गुडरे विवाहितेकडे पैशांची मागणी करत राहिल्याने विवाहितेने आपल्याकडील इतर दागिने दुसऱ्या सोनाराकडे गहाण ठेवून इतरांकडून कर्ज घेऊन भामटया विजय गुडरे याला आणखी रक्कम पाठवुन दिली. त्यानंतर देखील भामटया विजय गुडरे याने ज्या ज्वेलर्सच्या माध्यमातून विवाहितेने पैसे पाठविले होते, त्या ज्वेलर्सला परस्पर संपर्क साधुन ज्वेलर्सला पोलीस असल्याचे सांगुन विवाहितेने गहाण ठेवलेल्या दागिन्यांवर ज्वेलर्सकडून १० हजार रुपये घेतले.

अशा पद्धतीने भामटया विजय गुडरे याने विवाहितेकडून २ लाख २० हजार रुपये उकळल्यानंतर देखील त्याने वेगवेगळी खोटी कारणे सांगुन विवाहितेला कार देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे विवाहितेने त्याच्याकडे आपल्या पैशांची मागणी केल्यानंतर त्याने पैसे देण्यास सुद्धा टाळाटाळ केली. त्यामुळे विवाहितेने विजय गुडरे बाबत माहिती काढली असता, तो पोलीस नसल्याचे तीला समजले. त्यानंतर विजय गुडरे याने फसवणुक केल्याचे विवाहितेच्या लक्षात आले. त्यानंतर तीने कळंबोली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी विजय गुडरे या तोतया पोलिसा विरोधात फसवणुकिसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

## विना परवाना अग्नीशस्त्र बाळगल्याप्रकरणी एकजण गजाआड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

विना परवाना अग्नीशस्त्र जवळ बाळगल्याप्रकरणी तळोजा पोलिसांनी एका इसमास ताब्यात घेतले आहे.

एक इसम तळोजा नावडे ब्रीजखालील कच्च्या रोडवर अग्नीशस्त्र घेवून येणार असल्याची माहिती तळोजा पोलीस ठाण्याचे सपोनि विजय पवार यांना गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळताच त्यांनी पो.नि.संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि विजय पवार, पो.हवा. नैनेश पाटील, पो.ना.विजय पाटील, पो.ना.शंकर शिंदे, पो.शि.अनिल जाधव, पो.शि.स्वप्नील पाटील, पो.शि.संदेश उतेकर आदींच्या पथकाने सदर ठिकाणी सापळा रचून आरोपी सर्वेश करुणाशंकर पांडे उर्फ साजन (२८) याला ताब्यात घेतले असता त्याच्याजवळ २५ हजार रुपये किंमतीचा पिवळ्या सोनेरी रंगाचा भारतीय बनावटीचे लोखंडी पिस्टल आढळून आल्याने ताब्यात घेतले आहे. व त्याच्याविरुद्ध भारतीय हत्यार कायदा १९५९ चे कलम ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१), १, ३५ प्रमाणे कारवाई केली आहे.